महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर–440 001
Email : msboardnagpur@gmail.com

पत्र क्र.: नाविमं / मागो / प्रात्य / 503
नागपूर, दिनांक 04/02/2025

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :– माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षा फेब्रु / मार्च 2025 चे प्रात्याक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत (practical & Internal Exam.)मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत.

संदर्भ :– 1. राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं. / परीक्षा–2 / 120, दि. 09 / 01 / 2025
2. राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं. / परीक्षा–2 / 198, दि. 17 / 01 / 2025
3. राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं. / परीक्षा–2 / 425, दि. 30 / 01 / 2025

उपरोक्त संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी) चे प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत (practical & Internal Exam.) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबतच्या सूचना संदर्भिय पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. खालील दिलेल्या सूचनानुसार कार्यवाही करण्यात यावी.

1. फेब्रु / मार्च 2025 मधील इ.10 वी प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्यासाठी **"I.A.MARK"** ही लिंक मंडळाच्या **www.mahahsscboard.in** यासंकेतस्थळावर दिनांक 03 / 02 / 2025 ते 28 / 02 / 2025 या कालावधीमध्ये विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर गुण नोंदवितांना त्याची पुर्णतः गोपनीयता राहील याची सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक यांनी दक्षता घ्यावी.
2. माध्यमिक शाळेमधील विद्यार्थ्याचे बैठक क्रमांकनिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणांची Final Printout घेवून त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयासह) व तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इ. गुणतक्त्यानुसार संबंधित विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवून सदर गुण तक्त्यावर मुख्याध्यापक यांनी माध्यमिक शाळेचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे. व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकीटामध्ये, पाकीटावर माध्यमिक शाळेचे नाव व सांकेतांक क्रमांक लिहून गुणतक्ते व साहित्य बुधवार दिनांक <u>05 / 03 / 2025</u> रोजी विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत. सदर गूणतक्त्याची एक प्रत शाळेत माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.
3. माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्याचे नाव, आईचे नाव, व इतर दुरुस्त्या दि. **<u>28 / 02 / 2025</u>** पर्यत संदर्भिय पत्र क्र. 2 मधील सूचना क्र. 5 नुसार विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाच्या आहेत. यानंतर सदर दुरुस्त्यांसाठी ऑनलाईन लिंक उपलब्ध राहणार नाही.
4. अतिविलंब शुल्काच्या मुदतीमध्ये भरलेल्या व यामध्ये ज्या विद्यार्थ्याचे बैठक क्रमांक उपलब्ध झाले नाहीत अथवा विद्यार्थ्यांनी ऐनवेळी विषय बदल केला आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांचे गुण प्रचलित पध्दतीने निर्धारीत तारखेस विभागीय मंडळामध्ये जमा करावयाचे आहेत.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी –
1. मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–4 यांना माहितीस्वत समादराने अग्रेषित.
2. मा. शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्वत समादराने अग्रेषित.
3. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून दयावे.